दै. गोदातीर

# ली गेट परिसरातील खून आणि जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक

## ...निक गुन्हे शाखेची कारवाई; पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची माहिती



...ड- शहराच्या हिंगोली गेट ...ील फटाका मैदानामध्ये ५ ...च्या रात्री एकाचा निर्घृण खून ...रून झालेल्या आरोपीस व जबरी ...ील नाईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे ...च्या पथकांनी अटक केल्याची माहिती ...स अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ...३ रोजी पत्रकार परिषदेत दिली.

...हिंगोली गेट परिसरातील फटाका ...ावर मूळचा उमरखेड (जि.यवतमाळ) ...ल विकास यशवंत राऊत हा आपल्या ...ला मेडिसिन आणण्यासाठी छत्रपती ...जीनगर येथून नांदेडमार्गे गावाकडे जात ... तो रात्री फटाका मैदानावर गेल्यानंतर ...र करणारा टोळीच्या तावडीत सापडला ...ि यातच त्याच्यावर धारदार हत्याराने ...रून त्याचा निर्घृन खून केला. यात ...चे शरीर आणि डोके वेगळे करण्यात ...ले होते. तसेच रात्री कुत्र्याने चेहरा खाल्ला ... या प्रकरणी वजिराबाद ठाण्यात ...रोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा समांतर तपास वजिराबाद पोलिसांसोबत स्थानिक गुन्हे शाखा करत होती. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी त्यासाठी पथक तयार करून आरोपींच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना दिल्या. मयत विकास राऊत याचा मोबाईल छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज भागात त्याच्यासोबत काम करणारा त्याचा मित्र राहुल मोटे याच्याकडे सापडला. तो मोबाईल पोलिसांनी जप्त केल्यानंतर राहुल मोटे याची चौकशी केली आणि त्यानंतर हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील व सध्या भावेश्वर चौफाळा मरघाट नांदेड येथे राहणारा भारतसिंग धारासिंग बावरी (वय ३५) आणि त्याचा मित्र जय या दोघांनी मोबाईल विकल्याचे सांगितले. यावरून भारतसिंग बावरी याला पोलिसांनी अटक केली. त्याचा साथीदार जय हा अद्याप फरार फरार असल्याचे कोकाटे यांनी सांगितले.

त्यानंतर दुसऱ्या पथकाने नवी दिल्ली येथील व सध्या नगीनाघाट परिसरात राहणारा जसविंदरसिंग उर्फ जस्सी स्वरूपसिंग रामगडिया (वय ४२) याने आणि भारतसिंग बावरी या दोघांनी पाच जानेवारीच्या रात्री अखिलेशकुमार दुबे यांना लुटले होते. त्यांच्याकडून मोबाईल आणि पैसे जबरीने काढून घेऊन फरार झाले होते. त्यातील जसविंदरसिंग उर्फ जस्सी यालाही पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून मुद्देमालही जप्त करण्यात आला. या दोन्ही आरोपींना वजिराबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, एपीआय संतोष शेकडे, पीएसआय दशरथ आडे यांची उपस्थिती होती.

### पंजाबच्या गँगस्टरला अटक

यासोबतच नांदेड पोलिसांनी तिसरी कारवाई करत पंजाबचा गँगस्टर जुगरासिंग काबिलसिंग उर्फ युबी (वय २८) हा नांदेड येथून पंजाबकडे जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पंजाब राज्यातील तरणतारण येथील एका खून प्रकरणात तो फरार होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेकडे आणि पोलीस उपनिरीक्षक दशरथ आडे यांच्या टीमने अकोला येथील लोहमार्ग पोलिसांच्या मदतीने जर्मनीत राहणारा अमृतपालसिंग भाट याचा सहकारी गँगस्टर जुगरासिंग काबिलसिंग याला अकोला येथून अटक केली. अटक केल्यानंतर त्यालाही पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दै. लोकमत

लोकप्रभात*९४२२७३४०६२

# गँगस्टर अमृतपालसिंघच्या राइट हँडला रेल्वेतून उचलले

## श्रीगंगानगर एक्सप्रेसमधून जात होता पंजाबला पळून

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** पंजाबातील गँगस्टर अमृतपाल सिंघ बॉठ याचा राइट हँड आणि खुनाच्या प्रकरणात वॉंटेड जुगराज सिंघ काबल सिंघ याला पंजाबला पळून जाताना नांदेडच्या पथकाने अकोला येथे जाऊन पकडले. अमृतपाल सिंघ हा सध्या जर्मनी येथे असून त्या ठिकाणाहून तो पंजाबात आपली गँग चालवितो. जुगराज सिंघ हा त्याचे सर्व काम पाहत होता.

अमृतपाल सिंघ जर्मनी येथे पळून गेला असून त्याच्यावर पंजाब राज्यात १८ ते २० गुन्हे दाखल आहेत. तर २ गुन्हे बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक कायद्यानुसार आहेत. त्याचा राइट हँड जुगराज सिंघ काबल सिंघ पंजाबमध्ये खून करून नांदेडात आश्रयासाठी आला होता. पोलिस त्याच्या मागावर होते. सायबर सेलच्या मदतीने जुगराजसिंघ याचे लोकेशन काढण्यात आले. त्यात तो नांदेडवरून श्री गंगानगर एक्स्प्रेसने पंजाबकडे निघाल्याचे समजले. आरोपीच्या तिकीटावरून बोगी क्रमांक आणि इतर माहिती मिळविण्यात आली. त्यावेळी ही गाडी अकोला जंक्शनच्या जवळ होती.

नांदेड पोलिसांनी लगेच ही माहिती अकोला लोहमार्ग पोलिसांना दिली. ही गाडी रेल्वे जंक्शनवर दहा मिनिटे थांबणार होती. त्यानंतर लगेच नांदेड पोलिसही अकोला येथे पोहचले असून जुगराज सिंघ याला ताब्यात घेतले. मंगळवारी जुगराज सिंघ याला पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सपोनि. संतोष शेकडे, पोलिस उपनिरीक्षक दशरथ आडे, गंगाप्रसाद दळवी, राजू सिटीकर, दीपक ओढणे, राजीव बोधगिरे, अनिल बिरादार, अशोक म्हस्के, अकबर पठाण यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### पंजाबमध्ये गुन्हे अन् नांदेडात आश्रय

- पंजाबमध्ये गुन्हेगारांच्या अनेक टोळ्या असून त्या ठिकाणी गुन्हे केल्यानंतर आरोपी आश्रयासाठी नांदेडात येतात. यापूर्वीही पंजाब पोलिसांच्या माहिती-वरून गँगस्टरच्या टोळ्यातील साथीदारांना नांदेड पोलिसांनी पकडले होते.